N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** यावल **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0292 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/06/2022 17:07 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 15/06/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/06/2022

**Time From (वेळेपासून):** 13:06 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/06/2022 **Time (वेळ):** 16:36 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 030 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/06/2022 16:36 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 700 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** यावल तहसील कार्यालय

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अनिल मधुकर लोहार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोहराळे ता यावल जिजळगांव ,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोहराळे ता यावल जिजळगांव ,यावल,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुक्तार फकीरा तडवी | | | 1. यावल तहसील कार्यालय ,लोकेश नगर गजानन महाराज मंदीराम,यावल, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | शासकीय फिचे 1000/ रुपये (त्यात 200 रु. दारच्या 05 नोटा ) व लाचेची रक्कम 500/रुपये.( त्यात 500/ र | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खुलासा.... यातील फिर्यादी यांचे वडीलांच्या नावे मोहराळे शिवार ता. यावल येथे शेत गट नं 91/02मध्ये शेत जमीन आहे सदर शेत जमीनीचे व्यावहारा बाबतचा वाद मा. जिल्हाधिकारी सो जळगांव येथे सुरु होता. सदर वादा संर्दभात दि.11/11/2020रोजी न्याय निकाल झालेला आहे. सदर न्याय निकालांच्या नक्कला फिर्यादी यांना न्यायालयीन कामासाठी आवश्याक असल्याने त्यांनी दि.06/06/2022रोजी तहसील कार्यालया यावल येथे जावुन सबंधीत अव्वल कारकुन श्री मुक्तार तडवी यांची भेट घेवुन अर्ज दिला तेव्हा श्री मुक्तार तडवी यांनी फिर्यादी यांनी सदर न्याय निकालाच्या नक्कला देण्यासाठी 990/- रुपये शासकीय फि व 500/-रुपये मला द्यावे लागतील असे सांगुन फिर्यादी यांच्या कडे 990/-रुपये शासकीय फि च्या व्यक्तीरिक्त 500/-रुपये लाचेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि.15/06/2022 रोजी ला.प्र.वि. जळगांव कार्यालया कडे लेखी तक्रार दिली होती सदर तक्रारीची दि.15/06/2022रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकांने पंच व साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचे शेत जमीनीचे व्यावहारा बाबतचा वादा संर्दभात झालेल्या न्याय निकालाच्या देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांच्या कडे पंचासमक्ष 990/-रुपये व त्या व्यक्तीरिक्त 500/-रुपये लाचेची मागणी केली त्यांनतर आरोपी यांनी फिर्यादी यांचे कडुन 990/-रुपये शासकीय फि त्या व्यक्तीरिक्त 500/-रुपये लाचेची रक्कम आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा. वगैरे म।।चे फिर्यादि वरुन गुन्हा रजी. दाखल करुन गुन्ह्याचा खबरी रिपोर्ट अधी. असणारे मँजी. सो. याचे कडे पाठविला असुन वरीष्टाना ईमेल द्वारे संदेश पाठवण्यात आला असुन गुन्ह्याचा पुढील तपास एस. के . बचछाव पोलीस निरिक्षक अँन्टीकरप्शन बुरो जळगाव हे करित आहेत सदर टंकलीखीत केलेली फिर्याद सोबत जोडली आहे.

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or (किंवा)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): vinod madhukar Khandbahale
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): DGPVMKM9303 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पाथर्डी पोलीस स्टेशन

**Signature of Officer in Charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Aashit Namdev Kamble
**Rank**(पद): Dy. SP (Deputy Superintendant
**No.**(सं.):

फिर्याद

यावली पोलीस स्टेशन
दिनांक १५.०६.२०२२

**मी अनिल मधुकर लोहार, वय ३७ वर्षे, व्यवसाय खाजगी वाहन चालक रा.मोहराळे ता. यावल जि. जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई,वडील, पत्नी, भाऊ व मुलाबाळांसह एकत्र कुटुंबात राहतो.मी मालवाहतुक खाजगी वाहनावर चालकाची नोकरी करून उदरनिर्वाह करतो. दि.१४.०६.२०२२ रोजी सायंकाळी मी अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालय जळगांव येथे समक्ष जावुन पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेकडेस तहसिल कार्यालय यावल येथील अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांचे विरुध्द लाचे सबंधी तोंडी तक्रार केली होती. तेव्हा पाटील साहेब यांनी सदर कार्यालयात उपस्थित असलेले पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव साहेब यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली होती. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले होते.तेव्हा बच्छाव साहेब यांनी दोन्ही शासकिय पंचाची व माझी आपआपसात ओळख करुन दिली होती. तेव्हा पाटील साहेब व बच्छाव साहेब यांना मी दि.१५.०६.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता आपणास भुसावळ ते यावल रोडवर यावल गावाच्या अलीकडे २ कि.मी.अंतरावर असलेल्या विटा भट्टयांजवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.१५.०६.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा.मी माझे स्वत:चे हिरो होंडा सीडी डिलक्स मोटार सायकल क्रं.एमएच १९ बीएच.५६२३ सह भुसावळ ते यावल रोडवर यावल गावाच्या अलीकडे २ कि.मी.अंतरावर असलेल्या विटा भट्टयांजवळ उपस्थित होतो. तेव्हा एक खाजगी तवेरा वाहन क्रं.एम.एच.१९.बी.जे.३०६० हे माझे जवळ येवुन थांबले. तेव्हा सदर वाहनात उपस्थित असलेले श्री.बच्छाव साहेब यांनी मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यांनतर श्री.बच्छाव साहेब यांनी वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार बच्छाव साहेब यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वत:चे हस्ताक्षरात को-या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

माझे वडील नामे मधुकर हिरामण लोहार यांचे नावे वडीलोपार्जित मोहराळे शिवार ता.यावल येथील शेत गट नं.९१/२ मध्ये ४४ आर एवढी शेत जमिन आहे. सदर शेतजमिनीची देखरेख माझे आई वडील व भाउ हे करतात.

आमचे वर नमुद शेतजमिनीचे व्यवहारा बाबतचा वाद मा.जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव येथे सुरु होता. सदर शेतजमिनीचे व्यवहाराबाबतचे वादासंदर्भात मा.जिल्हाधिकारी सो,जळगांव यांनी दि.११.११.२०२० रोजी न्याय निकाल दिलेला आहे. सदर न्याय निकालाच्या प्रती मला न्यायालयीन कामासाठी आवश्यक असल्याने सदर निकालाच्या प्रती मिळणेसाठी मी दि.०६.०६.२०२२ रोजी अर्ज तयार केला. त्यानंतर तहसिल कार्यालय यावल येथे जावुन संबधीत अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांची भेट घेतली. तेव्हा मी वरील नमुद प्रकरणांचे नकला मिळणेबाबत श्री.मुक्तार तडवी यांचेकडेस अर्ज दिला.तेव्हा श्री.मुक्तार तडवी यांनी मला सांगितले की, तुमचे शेतजमिनीच्या व्यवहाराबाबतचे वादासंदर्भात मा.जिल्हाधिकारी सो,जळगांव यांनी दिलेल्या निकालाच्या नकला पाहिजे असतील तर त्यासाठी ९९०/-रु.शासकिय फि व मला ५००/- रु. द्यावे लागतील असे सांगितले. मी लागलीच तुम्हाला कागदपत्रांच्या नकला काढुन देईल असे सांगितले.

त्यावेळी मी श्री मुक्तार तडवी यांना मी देणार असलेल्या ९९०/-रुपयांची पावती मिळेल का? अशी विचारणा केली असता त्यांनी मला तुम्हाला ९९०/-रुपयांची पावती मिळेल असे सांगितले. त्यावरुन श्री.मुक्तार तडवी हे आमचे शेतजमिनीच्या व्यवहाराबाबतचे वादासंदर्भात मा.जिल्हाधिकारी सो,जळगांव यांनी दिलेल्या निकालाच्या नकला देण्यासाठी ९९०/-रु.शासकिय फि व त्याव्यतिरीक्त ५००/-रु. स्वत:साठी लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना माझे जवळ आता एवढे पैसे नाहीत, तुम्ही प्रकरण तयार करुन ठेवा मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो असे सांगितले तेव्हा श्री.मुक्तार तडवी यांनी मला याच कार्यालयात येवुन भेटा असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहून निघुन आलो होतो.

आमचे मोहराळे शिवार शेत गट नं.९१/२ येथील शेतजमिनीच्या व्यवहाराबाबतचे वादासंदर्भात मा. जिल्हाधिकारी सो,जळगांव यांनी दिलेल्या निकालाच्या नकला देण्याच्या मोबदल्यात ९९०/-रु.शासकिय फिच्या व्यतिरीक्त ५००/-रु. लाचेची रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांना ९९०/-रु.शासकिय फि च्या व्यतिरीक्त ५००/-रु. लाचेची रक्कम दिली नाही तर ते मला आमचे मोहराळे शिवार शेत गट नं.९१/२ येथील शेतजमिनीच्या व्यवहाराबाबतचे वादासंदर्भात मा.जिल्हाधिकारी सो,जळगांव यांनी दिलेल्या निकालाच्या नकला देणार नाहीत अथवा देण्यास टाळाटाळ करुन विलंब करतील म्हणुन मी नाईलाजाने

पंच सही:-१) २)

एस.के.बच्छाव
PI.ACB जळगांव

कारकुन श्री.मुक्तार तडवी यांना ९९०/–रु.शासकिय फि व अतिरीक्त ५००/–रु. लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. मी अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांची भेट घेण्यास तहसिल कार्यालय, यावल येथे आज रोजी जाणार आहे.बाबत तक्रार दिली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय यावल येथे माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह तहसिल कार्यालय,यावल येथे गेलो.त्यानंतर मी माझी मोटार सायकल यावल तहसिल कार्यालयाच्या बाहेर उभी केली. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे यावल तहसिल कार्यालयाच्या आत गेलो. तेव्हा सदर कार्यालयात अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी हे एका टेबल समोरील खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा मी पंच क्र.१ यांचे सह अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांचे जवळ जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा माझेत व अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांचेत माझे शेतजमिनीचे व्यवहाराबाबतच्या वादासंदर्भात झालेल्या निकालाच्या नकला मिळणे संदर्भात चर्चा झाली. तेव्हा मी अव्वल कारकुन श्री.मुक्तार तडवी यांना हे ९९० ची झाली पावती आपली, असे सांगितले. तेव्हा श्री.मुक्तार तडवी यांनी हा, ९९० आहे, असे सांगितले व श्री.मुक्तार तडवी यांनी उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन, उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैश्यांचा इशारा केला. तेव्हा मी त्यांना, वर काही देणे पडतील का? असे विचारले असता, त्यांनी मला दे ना, तुला द्यायचे ते असे सांगुन पुन्हा उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन पाचशे रुपयाचा इशारा केला. तेव्हा मी त्यांना ५००/–रुपये का असे विचारले तेव्हा श्री.मुक्तार तडवी यांनी तोंडाने होकार देवुन मानेने होकार दर्शविला. तेव्हा मी त्यांना आलोच मी दोन मिनीटात, असे सांगुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व श्री.मुक्तार तडवी यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी,सापळा पथकाने व बच्छाव साहेब यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व बच्छाव साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरीत्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर श्री.मुक्तार तडवी यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली १५००/–रू. रक्कम (त्यात ५००/–रू.दराची ०१ नोट व २००/–रु.दराच्या ०५ नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी शासकिय फि चे १०००/–रु.त्यात २००/–रु.दराच्या ०५ नोटा वेगळया काढुन सदर नोटांची घडी केली.तसेच लाच रक्कमेचे ५००/–रु. त्यात ५००/–रु.दराची ०१ नोट वेगळी काढली. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी शासकिय फि चे १०००/–रु.त्यात २००/–रु.दराच्या ०५ नोटांची घडी व लाच रक्कमेचे ५००/–रु. त्यात ५००/–रु.दराची ०१ नोट अशी एकुण १५००/–रु.रक्कम माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिली होती.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह श्री.मुक्तार तडवी यांना ९९०/–रु.शासकिय फि व ५००/–रु.लाच रक्कम देण्यासाठी यावल तहसिल कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह तहसिल कार्यालय,यावल येथे गेलो. मी माझी मोटार सायकल यावल तहसिल कार्यालयाच्या बाहेर उभी केली. तेव्हा बच्छाव साहेब यांनी यावल तहसिल कार्यालयाच्या परिसरात सापळा लावला होता.

त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे यावल तहसिल कार्यालयाच्या आत गेलो. सदर कार्यालयात एका टेबल समोरील खुर्चीवर श्री.मुक्तार तडवी हे बसलेले दिसले. तेव्हा मी व पंच क्रं.१ असे श्री.मुक्तार तडवी यांचे जवळ गेलो. तेव्हा मी श्री.मुक्तार तडवी यांना ए.टि.एम.बंद राहता, संतोषला सांगितलये पैसे द्यायचे, असे सांगितले. तेव्हा श्री. मुक्तार तडवी यांनी उजव्या हाताचा अंगठा व पहील्या बोटाने ईशारा करुन पैसे आणले आहेत का? असे इशा–याने विचारले तेव्हा मी माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली १५००/–रु.रक्कम उजव्या हाताने बाहेर काढुन त्यापैकी प्रथम १०००/–रु.त्यात २००/–रु.दराच्या ०५ नोटा बाजुस काढुन श्री.मुक्तार तडवी यांना दिल्या. व हे घ्या नऊशे नव्वद, हजार रुपये राहु द्या, असे सांगुन लागलीच ५००/–रु.लाच रक्कम पुन्हा श्री.मुक्तार तडवी यांना दिली व हे पाचशे रुपये, असे सांगितले. तेव्हा श्री.मुक्तार तडवी यांनी प्रथम १०००/–रु.व नंतर ५००/–रु. रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारली.त्यानंतर सदरची रक्कम दोन्ही हातांनी मोजली व सदरची १५००/–रु.रक्कम, ९९०/–रुपयाची पावती व माझा अर्ज असे त्यांचे समोरील टेबलावर असलेल्या एका फाईच्या खाली ठेवुन घेतली.

पंच सही:-१) [signature] २) [signature]

[signature]
एस.के.बच्छाव
PI. ACB जळगांव

[signature]

त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी श्री.मुक्तार तडवी यांना रंगेहाथ पकडले. त्यांनतर बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी श्री.मुक्तार तडवी यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी श्री.मुक्तार तडवी यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मुक्तार फकिरा तडवी, वय ५६, व्यवसाय नोकरी,अव्वल कारकुन, कोषागार,तहसिल कार्यालय,यावल ता.यावल जि. जळगांव रा.प्लॉट नं.१८, लोकेश नगर,गजानन महाराज मंदिरा मागे,यावल जि.जळगांव (खाते महसुल विभाग वर्ग–३) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने मुक्तार फकिरा तडवी यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई जळगांव येथे जावुन अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयात करण्यात आली.सदर कार्यालयातील एका रुममध्ये माझे,आरोपी मुक्तार तडवी व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी मुक्तार फकिरा तडवी,अव्वल कारकुन, कोषागार,तहसिल कार्यालय,यावल ता.यावल जि. जळगांव यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन दि.१५.०६.२०२२ रोजी पंचासमक्ष आमचे शेतजमिनीचे व्यवहाराबाबतचा वादासंदर्भात झालेल्या न्याय निकालाच्या नकला देण्याच्या मोबदल्यात माझेकडे पंचासमक्ष ९९०/–रु.शासकिय फि च्या व्यतिरीक्त ५००/– रू.लाचेची मागणी केली. त्यानंतर आरोपी यांनी माझेकडुन ९९०/–रु.शासकिय फि व त्या व्यतिरीक्त ५००/– रू. लाचेची रक्कम यावल तहसिल कार्यालयात दि.१५.०६.२०२२ रोजी १३.०६ वा.स्वत:स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी मुक्तार फकिरा तडवी, अव्वल कारकुन, कोषागार,तहसिल कार्यालय,यावल ता.यावल जि.जळगांव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**फिर्यादीची सही**
दि.१५.०६.२०२२

अनिल मधुकर लोहार

पंच सही:–
१)
२)